# आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत बाळासाहेब देसाई यांचे योगदान महत्वाचे

विजय चोरमारे

सांगली, दि. ०७: स्वतंत्र महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये यशवंतराव चव्हाणांबरोबर अनेक राजकीय नेत्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. यामध्ये बाळासाहेब देसाई यांचे सर्वांगीण स्वरुपाचे कार्य महत्त्वाचे ठरते. बांधकाम मंत्री, शिक्षण मंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री म्हणून त्यांनी केलेले काम आदर्शवत होते. फुले, शाहू, आंबेडकर यांची विचारधारा समाजात रुजवण्याचे काम त्यांनी केले. गरीब मुलांना इ.बी.सी. सवलत सुरु केली. शिक्षणापासून कोणी वंचित राहणार नाही याची काळजी घेतली. दळणवळणाचे जाळे उभे केले. प्रशासनाला शिस्त लावत लोकाभिमुख निर्णय घेतले. अतिशय द्रष्टेपणाने त्यांनी महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये योगदान दिले, असे मत जेष्ठ पत्रकार डॉ. विजय चोरमारे यांनी व्यक्त केले. लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन आणि श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने 'लोकनेते बाळासाहेब देसाई आणि महाराष्ट्राची जडणघडण' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. अवनीश पाटील यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परीचय प्रा. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी करुन दिला. या अध्यासनाचे सल्लागार समितीचे सदस्य प्रा.व्ही.एस. पानसकर यांनी लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जी.कुलकर्णी यांनी अशा स्वरुपाच्या व्याख्यानांची समकालातील प्रस्तुतता सांगितली. कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ.उर्मिला क्षीरसागर तर सूत्रसंचालन प्रा.रोहिणी देशपांडे यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक आणि विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

---

संदर्भ/केएम/२८/ News file / 756 दि. ०७/०३/२०२२

प्रति,

मा. संपादक,

दैनिक.-------तरुण भारत-------------सांगली.

महोदय,

वरीलप्रमाणे आमच्या महाविद्यालयाची बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून कृपया प्रसिद्ध करावी ही विनंती.

कळावे

डॉ. आर. जी. कुलकर्णी
प्राचार्य